## विधि व न्याय विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल २०१७

## अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक सीआरसी. २५१७/प्र.क्र.७९/का. बारा.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) याच्या कलम ३ च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा, त्या वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट आणि समुद्रपूर तहसीलाशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक ३ एप्रिल २०१७ पासून, वर्धा जिल्ह्यातील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) हिंगणघाट यांस, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम, (१८६९ चा १४) याअन्वये स्थापन करण्यात आलेल्या हिंगणघाट व समुद्रपूर येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये येणाऱ्या उक्त अधिनियमाखालील प्रकरणांवर कार्यवाही करण्याची अधिकारिता असल्याचा विनिर्देश करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नीरज धोटे,**
शासनाचे सहसचिव व विधि सल्लागार.